Vivek Vyaspeeth
Socialwork Practices And Research Centre

SPARC
To ignite the people

स्वा. सावरकर अध्यसन केंद्र, होळी स्मारक, डेक्कन कॉर्नर पुणे. संपर्क – ०२०–२५४६३१३१

दिनांक : १८ डिसेंबर २०१७

प्रति,
मुख्याध्यापक / BPT समन्वयक

विषय : ब्लॉक प्लेसमेंट प्रशिक्षण (बीपीटी) साठी विद्यार्थी पाठविणेबाबत

महोदय,

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आणि विवेक व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या SPARC या केंद्राशी आपण गेल्या ३ ते ४ वर्षांपासून सुपरिचत आहात. या केंद्राद्वारे विविध उपक्रम घेतले जातात. त्यात प्रामुख्याने –

- 'सामाजिक कार्य पदविका' – एक वर्षाचा अभ्यासक्रम
- पुणे शहरातील विविध झोपडपट्ट्यांमधे सर्वेक्षण, पृथ्थकरण, समस्या आकलन, मार्गदर्शन
- विविध संस्थांच्या सहयोगाने प्रकल्प उभारणी, प्रकल्प व्यवस्थापन आणि कुशल मनुष्यबळ जोडणी
- महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांबरोबर नियमीत संपर्क.
- ग्रामीण भागातील समाजकार्य महाविद्यालयातील MSW विद्यार्थ्यांचे बीपीटी (Block Placement Training)

आपल्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे; आणि सध्या ते विविध सामाजिक संस्थांमध्ये उत्तम प्रकारे कार्यरत आहेत. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या विषयामधे एक महिना काम करण्याची संधी दिली जाते. पुस्तकी ज्ञानाचा उपयोग आणि प्रत्यक्ष काम याची सांगड घालताना आपल्याकडे कोणती कौशल्ये आवश्यक आहेत, याचीही विद्यार्थ्यांना जाणीव होते. या प्रशिक्षणानंतर होतकरू विद्यार्थ्यांना रोजगाराची संधीही दिली जाते.

खाली दिलेल्या क्षेत्रात विद्यार्थी BPT करू शकतात.

- आरोग्य
- महिला सक्षमीकरण
- दिव्यांग व्यक्ती
- नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन
- शिक्षण
- बाल विकास
- पर्यावरण
- आदिवासी विकास आणि ग्रामीण विकास

या वर्षी सदर बीपीटी (Block Placement Training) **शनिवार दि. १९ मे २०१८ ते सोमवार दि. १८ जून २०१८** या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. आपल्या महाविद्यालयातील या प्रशिक्षणसाठी योग्य वाटत असलेल्या फक्त ५ विद्यार्थी आणि ५ विद्यार्थीनींना या प्रशिक्षणासाठी जरूर पाठवावे. विद्यार्थ्यांची यादी आपण sparc@mespune.in या इ–मेलवर पाठवावी. यादी आल्यानंतर पुढील नियोजन कळविण्यात येईल. हे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रमाणपत्र देण्यात येईल.

आम्हाला खात्री आहे की, हा अनुभव त्यांना बदलती सामाजिक परिस्थिती समजून घेण्यास मदत करेल, सामाजिक प्रश्नांबद्दल योग्य दृष्टिकोन विकसित करेल आणि त्यांचे कौशल्य वाढविण्यास हातभार लागेल.

आपण संधी दिल्यास या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आपल्या महाविद्यालयात येण्यास इच्छुक आहेत.

Dr. D. A. ... College of Social Work

स्नेहांकित,

595
17/3/18

e mail dt. 12.3.2018
प्रा. शहापूरकर, डॉ. पांडे,
प्रा. ...
माहिती व कार्यवाहीस्तव

Pande

12.3.2018

**मुग्धा वाड**
**समन्वयक**

**अधिक माहितीसाठी :**
पौर्णिमा कांबळे – ७२४९०८३८४४
राधा भाग्यवंत – ९६५७५११४५०

Scanned by CamScanner